# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
## Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


MERC/ADM/RTI/022/2022/**0206** Dt. 09.05.2022

प्रति,
श्री. सुरज प्रदीपकुमार अजमेरा,
फ्लॅट नं. ३, राठी प्लॉझा अपार्टमेंट,
दुसरा मजला, समर्थ नगर,
औरंगाबाद- ४३१००१.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. २०.०४.२०२२ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि.२२.०४.२०२२ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरणला फिडरवाईज लोडशेडिंग महाराष्ट्रात अंमलबजावणी करण्यासाठी देण्यात आलेले परवानगी आदेशाची प्रत<br>तसेच दि. १४.०८.२०१२ SE/LM/Guidelines ला मा. आयोगाने देण्यात आलेले मान्यता / परवानगीची प्रत ऑक्टोबर २००५ ते आजपर्यंत | आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाचे आदेश, दि. २६.११.२०१२ च्या प्रकरण 41 चा 2012 मध्ये उपलब्ध आहे. सदर आदेश आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहे.<br>तसेच आपणांस नेमकी कोणती माहिती हवी आहे याचे पूर्ण बोध होत नाही.. कृपया माहितीचा अधिकार अधिनियम कलम 2 मधील उपखंड (च) प्रमाणे माहिती मागावी. जेणे करुन जन माहिती अधिकारी यांना आपणांस योग्य माहिती पुरविणे शक्य होईल ** |

**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रकरण 1 मधील 2 (च) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

जर आपणांस प्रकरण क्र. ४१ चा २०१२ आदेशाच्या संपूर्ण छायांकित प्रती हव्या असल्यास, माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार पुढीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची छायांकित प्रतीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| ५१ | २ | १०४/- | अंदाजे रु. ६०/- | १६४/- |
| | | | एकूण रु. | **१६४/-** |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा आपल्या प्रतिनिधीद्वारे रोख रक्कम रू. **१०४/-** जमा करुन शुल्क भरल्याची पावती /चलन पुरावा सत्य प्रत समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील.

**Bank details are as under:**

| | | |
|---|---|---|
| Bank Name | : | State Bank of India |
| Account No. | : | 30192810455 |
| Branch | : | Cuffe Parade, Mumbai – 400 005. |
| IFSC Code | : | SBIN0005345 |

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री अनिलकुमार उके, संचालक (विधी) प्रभारी /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई-४००००५. दूरध्वनी क्र.०२२-२२१६३९६४/६५ /६९. **Email:** anilkumar.ukey@merc.gov.in

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी